# केंद्राची तिजोरी का भरायची? लोकलचे तिकीट काढायचे बंद करा

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

आजचा रेल्वे प्रवाशांचा अपघात अत्यंत वेदनादायी आहे. पण दुर्दैवाने हा अपघात झाला असे म्हणता येणार नाही. हा अपघात म्हणजे दुर्दैव नव्हे तर केंद्र सरकार, राज्य सरकार आणि रेल्वे प्रशासनाने केलेले हत्याकांड आहे. मुंबईकर दुसरा पर्याय नसल्याने जीवावर उदार होऊन लोकलचा प्रवास करतो. त्याला कुठलीही सुविधा मिळत नाही तरी तो लोकलचे तिकीट काढतो. इमानदारीने महिन्याचा पास काढतो. हे सर्व पैसे केंद्राच्या तिजोरीत जातात, पण त्यातील आठ आणेही लोकलच्या प्रवाशांसाठी खर्च होत नाहीत. अशा या बहिऱ्या आणि निर्लज्ज, निष्ठुर सरकारला ताळ्यावर आणायचे असेल तर पहिली त्यांची रसद बंद करायला हवी. रेल्वे प्रवाशांनी एकजुटीने निर्णय घ्यायला हवा की, लोकलची सेवा आणि सुविधा जोपर्यंत सुधारत नाहीत, तोपर्यंत आम्ही लोकलचे तिकीट काढणार नाही. केंद्राच्या तिजोरीत पैसे पडेनासे झाले की मगच हे जागे होतील. राजकारण्यांना पैशाची भाषा कळते. तेव्हा त्यांना पैशाच्याच भाषेत उत्तर द्या.

ट्रॅकची संख्या वाढवलीत तर तिकीट काढू, लोकलच्या फेऱ्या वाढवल्या तर तिकीट काढू, रेल्वे स्टेशनवर पूल बांधलेत तर तिकीट काढू, लोकलचे वेळापत्रक कोलमडले तर त्याची अनौन्समेंट करणार असाल तर तिकीट काढू, लोकलच्या महिला डब्यात गार्ड ठेवणार असाल तर तिकीट काढू, प्लॅटफॉर्मवर तातडीची वैद्यकीय सेवा ठेवलीत तरच तिकीट काढू, असे स्पष्ट बजावलेच पाहिजे. आम्हाला सुविधा आणि सेवा द्याल तरच तुमची तिजोरी भरेल. जोपर्यंत या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत तिकीट काढू नका. त्यांची तिजोरी रिकामी ठेवा. ज्या दिवशी तिजोरी रिकामी राहील त्याच दिवशी त्यांना मुंबईच्या लोकल प्रवाशांची ताकद कळेल. ज्या दिवशी ताकद कळेल त्या दिवसांपासून सरकार आणि प्रशासन आपल्याकडे लक्ष देईल.

आता ही टोकाची भूमिका घेण्याची वेळ आली आहे. कारण तिकीट काढून दर दिवशी सरकारच्या तिजोरीत कोट्यवधीची रक्कम भरणाऱ्या लोकल प्रवाशांच्या जिवाची किंमत राहिलेली नाही. आज मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत जाहीर केली. त्यातही हात मारला जाईल. सामान्य माणसाच्या जीवनाची किंमत या राजकारण्यांनी पाच लाख रुपये केली आहे आणि बुलेट ट्रेनसाठी एक लाख कोटी ओतणार आहेत. मुंबईत मोनो रेल्वे सुरू केली तिला रोजचा तीन लाखाचा तोटा आहे. तुमच्याकडे इतका पैसा झाला आहे तर आमच्या लोकल प्रवाशांना सुविधा द्यायला हा पैसा का नाही वापरत? मोनोचा तीन लाख रुपयांचा रोजचा तोटा चालतो आणि लोकल स्टेशनवर मुतारीत जायला सामान्य माणसाकडून दोन रुपये उकळताना यांना लाज वाटत नाही. त्यांना मोठ्या रकमेच्या योजना हव्यात कारण त्यात पैसा जास्त मिळतो. पूल, सुरक्षा, रेल्वे क्रॉसिंगवर गेट या छोट्या गोष्टींत मलिदा नाही म्हणून त्याकडे लक्ष देणार नाहीत.

मुंबईचा माणूस हा बॉम्बवर बसलेला आहे. लोकल पकडताना पाय घसरून मृत्यू होतो, लोकलमधून ढकलले जाऊन मृत्यू होतो, पूल नाही म्हणून रुळावरून धावताना मृत्यू गाठतो, डबे रुळावरून घसरल्याने प्राण जातो, दुचाकी खड्ड्यात पडून जीव जातो, तर समुद्राची लाट कुणाला खेचून नेते, बॉम्बस्फोटाने हजारो मृत्युमुखी पडतात, दहशतवादी हल्ले घडतात, अगदी उघड्या गटारात पडूनही मृत्यू ओढावतो. इथे जीविताची शाश्वतीच नाही. तरीही मुंबईकर रोजची लोकल पकडतो. दुचाकीसाठी पार्किंग शोधतो, बसची वाट बघतो, उशिरा पोहचले तर बॉसचे ओरडणे ऐकतो. मुंबईकर असाच जगतो कारण त्याच्याकडे पर्याय नाही. आज दर्दनाक हादसा घडला, तरीही उद्या याच पुलावरून हजारो मुंबईकर धावत पळत ऑफीस गाठताना दिसतील.

राजकारण्यांनी त्यांचे काम केले. सत्ताधाऱ्यांनी सांत्वन करून आश्वासने दिली. विरोधकांनी तिथेच बसून सत्ताधाऱ्यांविरुद्ध घोषणा दिल्या. त्यांचे एकपात्री प्रयोग संपले. उद्यापासून एलफिन्स्टन स्टेशनचे नाव बदलून 'प्रभादेवी' करा ही घोषणा पुन्हा सुरू करतील. पण तुमचे आमचे काय? आपल्या जीवाशी ज्यांना देणेघेणे नाही, ते आपल्याकडे लक्षही देणार नाहीत. आपले मरण आपल्या हाती नाही, पण आपले जगणे सुधारायचे आपल्या हाती आहे. लोकलचे तिकीट काढणे बंद करून त्यांची रसद तोडा, ते आपोआप आपल्या प्रश्नांकडे लक्ष देतील. आपण एकजुटीने हे आंदोलन छेडले नाही तर चित्र बदलणार नाही. काळ बदलत राहील तसे पैसे खाणाऱ्यांचे मुखवटे बदलत राहतील. आपल्या नशिबी फक्त पुढच्या आघातानंतर अश्रू ढाळण्यापलीकडे काहीच राहणार नाही.